दैनिक दिव्य मराठी

30-May-2018
नाशिक सिटी Pa

# 'दिव्य मराठी'तर्फे दिव्य एज्युकेशन ॲण्ड करिअर फेअर प्रदर्शन एकपासून

- नामांकित शैक्षणिक संस्थांचा असेल सहभाग
- विद्यार्थी आणि पालकांना होणार फायदा

प्रतिनिधी | नाशिक

विद्यार्थी व पालकांना करिअरच्या विविध पर्यायांची माहिती व्हावी, या उद्देशाने दैनिक 'दिव्य मराठी'तर्फे शुक्रवार दि. १ जूनपासुन ३ जूनपर्यंत 'दिव्य एज्युकेशन ॲण्ड करिअर फेअर-२०१८' या शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. संदीप युनिव्हर्सिटी प्रायोजित हे प्रदर्शन सिटी सेंटर मॉलजवळील लक्षिका सभागृह येथे होणार असुन, शहरातील विद्यार्थी व पालकांना एकाच छताखाली विविध नामांकित शैक्षणिक संस्थांच्या स्टॉल्सला भेट देता येईल व तेथे उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधांची माहिती जाणून घेता येणार आहे.

'दिव्य मराठी'तर्फे आयोजित करण्यात आलेले हे प्रदर्शन महात्मा गांधी विद्यामंदिर यांनी प्रस्तुत केले असून, के. व्ही. एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्था आणि




महेश ट्युटोरियल्स यांच्या विशेष सहकार्याने होत आहे. शहरातील विविध शैक्षणिक संस्थांचा सहभाग राहणार असून, विद्यार्थ्यांना दहावी व बारावीनंतरच्या करिअरच्या संधींची माहिती मिळू शकणार आहे.

इंजिनिअरिंग, मेडिकल, आयटी संस्था, हॉटेल मॅनेजमेंट, स्पर्धा परीक्षा, एमबीए, पॉलिटेक्निक, फॅशन व इंटेरिअर डिझायनिंग, शिक्षणशास्त्र, ॲनिमेशन, कोचिंग क्लासेस यांसह असंख्य पर्यायांच्या संधी या प्रदर्शनातून एकाच छताखाली उपलब्ध होणार असल्याने या प्रदर्शनाला नक्की भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नाशिक बनलेय एज्युकेशन हब

आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण आणि तत्सम सुविधा देणाऱ्या अनेक शैक्षणिक संस्था आज नाशिक व नाशिकलगतच्या परिसरात उभ्या आहेत. या संस्थांचा दर्जा आणि गुणवत्ता बेजोड असल्यानेच आज देशाच्या नकाशावर नाशिक हे एक एज्युकेशन हब म्हणून पाहिले जात आहे. राज्यातीलच नाही तर देशभरातील विद्यार्थी याचमुळे नाशिकमध्ये प्रवेश घेऊन शिक्षण पूर्ण करीत आहेत. 'दिव्य मराठी'च्या या दिव्य एज्युकेशन एक्स्पोमध्ये अशाच नामांकित शिक्षणसंस्था असतीलच त्याशिवाय राज्याबाहेरील काही संस्थांचाही सहभाग असेल, ज्यामुळे स्थानिक पालक आणि विद्यार्थ्यांकरिता हे प्रदर्शन म्हणजे एक मोठी संधीच असणार आहे.